

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि श्री रवळनाथ संस्थेमध्ये झालेल्या सामंजस्य कराराचे हस्तांतरण डॉ. डी. टी. शिर्के व डॉ. पी. एस. पाटील यांच्या उपस्थितीत करताना डॉ. विलास नांदवडेकर व एम. एल. चौगुले.

# शिवाजी विद्यापीठाचा 'रवळनाथ'शी सामंजस्य करार

गडहिंग्लज, ता. १८ : सहकारी क्षेत्रातील बहुराज्य संस्था असलेल्या श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीसमवेत शिवाजी विद्यापीठाने केलेल्या सामंजस्य करारामुळे अर्थसाक्षरता प्रसार, प्रशिक्षण व संशोधन कार्याला गती येईल, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली.

श्री. रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग फायनान्स सोसायटी आजरा आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार झाला. या वेळी ते बोलत होते. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, 'रवळनाथ'चे संस्थापक अध्यक्ष एम.एल. चौगुले यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ.शिर्के म्हणाले, "शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रात अर्थसाक्षरता प्रसाराची मोठी गरज आहे. त्यासाठी 'रवळनाथ'च्या सहकार्याने परिषदा, कार्यशाळा व चर्चासत्रे घेण्यात येतील." सामंजस्य करारावर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, एम.एल. चौगुले यांनी स्वाक्षरी केल्या. याप्रसंगी चौगुले यांनी 'रवळनाथ'तर्फे गरजू विद्यार्थ्यांसाठी एक लाखाचा निधी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला. डॉ. एम. एस. देशमुख यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी आभार मानले. डॉ. विजय ककडे, प्रा. विजय आरबोळे, प्रा. मीना रिंगणे, रेखा पोतदार, जी. के. नाईक, विजयकुमार हरगुडे आदी उपस्थित होते.

> **अर्थ, सहकार व वाणिज्य क्षेत्रांमध्ये अनेक नवीन प्रवाह येत आहेत. याचा उहापोह करण्यासह सहकारात कार्यरत संचालक व सदस्यांना त्याविषयी अवगत करण्याची नितांत गरज आहे. त्यादृष्टीने प्रशिक्षण कार्यक्रमासाठी हा करार उपयुक्त ठरेल.**
>
> **- एम. एल. चौगुले, संस्थापक अध्यक्ष, रवळनाथ हौसिंग फायनान्स**

# विद्यापीठात अ‍ॅकॅडमिक ऑडिट सुरू

**कोल्हापूर :** 'नॅक'च्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठातील अधिविभाग अ‍ॅकॅडमिक ऑडिटला गुरुवारपासून सुरुवात झाली आहे. १५, १६ व १७ मार्च रोजी नॅक बेंगलोरची पिअर टीम विद्यापीठास भेट देऊन पाहणी करणार आहे. सकाळी नऊ वाजल्यापासून विद्यापीठातील ३४ अधिविभागांचे अ‍ॅकॅडमिक ऑडिट सुरू झाले आहे. यात विभागांनी संशोधनसह इतर गोष्टींचे सादरीकरण केले.

# विद्यापीठात अधिविभाग ॲकॅडमिक ऑडिटला प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे नॅक मूल्यांकन करण्यासाठी १५ ते १७ मार्च दरम्यान नॅक बेंगलोरची पिअर टीम विद्यापीठात येणार आहे. या पार्श्वभूमीवर गुरूवारपासून अधिविभाग ॲकॅडमिक ऑडिटला प्रारंभ झाला आहे. अजून दोन दिवस हे ऑडीट सुरू राहणार आहे. या गुणांकानात ७० टक्के हे संख्यात्मक माहितीला गुण दिले जातात. तर ३० टक्के गुण हे गुणात्मक दर्जासाठी असतात. त्यामुळे गुरूवारी अधिविभागातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी केलेले संशोधन, राष्ट्र्य, आंतरराष्ट्रीय पातळीवरील घेतलेल्या कार्यशाळा, चर्चासत्रे, अधिविभागातील विद्यार्थी संख्या, प्राध्यापक संख्या, प्राथमिक सोयी-सुविधा आदींचे सादरीकरण विद्या-पीठातील पदाधिकाऱ्यांसमोर केले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षप्रमुख डॉ. एम. एस. देशमुख प्रशासकीय अधिकारी, विभागप्रमुख यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

# ग्रीन इलेक्ट्रॉनिक्सवर विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागातर्फे 'ग्रीन इलेक्ट्रॉनिक्स' या विषयावर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. गडचिरोली येथील प्रा. योगेश दूधपचारे यांनी गुगल अर्थचा कसा वापर करायचा यासंदर्भात मार्गदर्शन केले. नागपूर येथील प्रा. श्रीकृष्ण ढाले यांनी बिल्डींग कन्स्ट्रक्शनवर मार्गदर्शन केले. पुणे येथील डॉ. रजनी पंचांग यांनी पर्यावरणाचा समतोल कसा साधायचा याबाबत तर मराठवाडा विद्यापीठाचे डॉ. पाटील यांनी सेन्सॉर टेक्नॉलॉजी कशी ग्रीन टेक्नॉलॉजी होवू शकते यासंदर्भात मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रा. पन्हाळकर डॉ. गायकवाड, डॉ. भानारकर, अभिजित पवार आदी उपस्थित होते.

आय विटनेस

# शिवरायांना सूर्यकिरणांचा अभिषेक



महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेले छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आज, शुक्रवारी साजरी होत आहे. त्या पार्श्वभूमीवर साक्षात सूर्यदेवानेच महाराजांना आपल्या सोनेरी किरणांचा अभिषेक घातल्याचे हे अनोखे दृश्य जयंतीच्या पूर्वसंध्येला गुरुवारी कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात पाहायला मिळाले. (नसीर अत्तार)